दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB | Racold | legrand | HAVELLS | L&T SWITCHGEAR | INDOASIAN
Finolex | KOLORS | USHA | PHILIPS | GreatWhite | SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ३ रे अंक ११३ वा रविवार दि.१७ सप्टेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# राज्य मंत्रीमंडळाला लातूर जिल्ह्याचा विसर
# माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख

लातूर / प्रतिनिधी :–मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने मोठा गाजावाजा करून छत्रपती संभाजीनगर येथे घेतलेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीतून या विभागाची निराशाच झाली आहे, शासनाने जुन्या योजनाच नव्याने जाहीर करून येथील जनतेची दिशाभूल केली आहे. या विभागात लातूर जिल्हा आहे याचा तर सरकारला विसरच पडला आहे, अशी प्रतिक्रीया राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी व्यक्त केली आहे. या संदर्भाने प्रतिक्रीया व्यक्त करतांना माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी म्हटले आहे की, बऱ्याच अवकाशानंतर मराठवाड्यात झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत कृषी, शिक्षण, औद्योगिकीकरण, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य या विभागांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होऊन येथील अनुशेष दूर होईल ही अपेक्षा होती मात्र ती फोल ठरली आहे. सततच्या दुष्काळामुळे लातूर, उस्मानाबाद, बीड जिल्ह्यातील कृषी क्षेत्राबरोबरच औद्योगिक प्रगती थंडावली आहे. या पार्श्वभूमीवर या जिल्ह्यात पाणी आणण्याच्या दृष्टीने मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय होणे अपेक्षित होते मात्र मराठवाडा वॉटरग्रीडचा चेंडू पुन्हा केंद्राकडे ढकलून राज्य शासनाने हात झटकले आहेत. लातूरच्या शैक्षणिक क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी शैक्षणिक व पूरक सुविधांची उभारणी, लातूर शहराचा बाह्य वळण रस्ता, एमआयडीसीचा तिसऱ्या टप्प्यातील विस्तार, अवर्षणग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदत यासंबंधीच्य घोषणा मंत्रिमंडळ बैठकीनंतर केल्या जातील असे वाटत होते मात्र राज्य सरकारने फक्त मराठवाड्यात येऊन बैठक घेण्याचे सोपस्कार पूर्ण केले आहेत. छत्रपती संभाजीनगर येथे बैठक होऊनही मराठवाडा विभागाला विशेष असे काही द्यायचचे नव्हते तर ही बैठक घेतली कशासाठी ? असा प्रश्न आता निर्माण झाला आहे असेही आमदार देशमुख यांनी म्हटले आहे.




## खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपीला अटक. गांधी चौक पोलीस स्टेशनच्या डी.बी. पथकाची कारवाई.

लातूर :– खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपीला अटक. गांधी चौक पोलीस स्टेशनच्या डी.बी. पथकाची कारवाई. याबाबत थोडक्यात माहिती अशी की, पोलीस ठाणे गांधीचौक हद्दीत ११/०९/२०२३ रोजी गंजगोलाई परिसरात शॉपिंग कॉम्प्लेक्स चे छतावर सलमान उर्फ दस्तगीर शाबुद्दीन शेख, वय ३० वर्ष, राहणार महापूर याला गुन्ह्यातील संशयित आरोपींनी पूर्ववैमनस्यातून जबर मारहाण करून त्याचा निघृण खून केला होता. खून केल्यापासून गुन्ह्यातील आरोपी फरार झाले होते. सदरचा गुन्ह्यातील फरार झालेल्या आरोपीचा शोध घेण्याकरिता पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी मार्गदर्शन व सूचना केल्या होत्या. त्याअनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, उपविभागीय पोलीस अधिकारी (लातूर शहर) भागवत फुंदे यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे गांधीचौक चे पोलीस निरीक्षक प्रेमप्रकाश माकोडे यांचे नेतृत्वात पथक तयार करून फरार आरोपीचा विविध मार्गाने शोध घेण्यात येत होता. नमूद पथकाने सदर आरोपी वास्तव्य करण्याची शक्यता असलेले विविध ठिकाणी भेटी देऊन बातमीदार तयार केले होते. दरम्यान बातमीदाराकडून मिळाले मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून फरार आरोपी नामे विशाल उत्तम रणदिवे, राहणार देवळी तालुका जिल्हा लातूर. हा मध्यवर्ती बसस्थानकाच्या परिसरात स्वतःचे अस्तित्व लपवून फिरत असल्याचे पथकाला समजले.त्यावरून दिनांक १५/०९/२०२३ रोजी सदरचे पथक मध्यवर्ती बसस्थानक परिसरात पोहोचून नमूद आरोपी विशाल रणदिवे यास ताब्यात घेऊन पोलीस ठाणे गांधी चौक येथे आणण्यात आले. त्याच्याकडे नमूद गुन्ह्याबाबत विचारपूस केली असता त्याने पूर्ववैमनस्यातून भांडण होऊन त्याने व त्याचा आणखीन एक साथीदाराने सलमान उर्फ दस्तगीर शेख याला जबर मारहाण करून खून केल्याचे कबूल केले. त्यावरून पोलीस ठाणे गांधी चौक येथे दाखल असलेला गुन्हा रजिस्टर क्रमांक ४४७/२०२३ कलम ३०२, ३४ भादवि प्रमाणे दाखल गुन्ह्यात अटक करून न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने विशाल रणदिवे याची दिनांक १८/०९/२०२३ पर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास गांधी चौक पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कोले हे करीत आहेत. तसेच गुन्ह्यातील आणखीन एक फरार आरोपीचा शोध सुरू आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. सोमय मुंडे, अपर पोलिस अधीक्षक डॉ.अजय देवरे,उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे यांचे मार्गदर्शनात गांधी चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रेमप्रकाश माकोडे यांचे नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक अक्रम मोमीन, पोलीस अमलदार राजेंद्र टेकाळे, दामोदर मुळे, राम गवारे, उमाकांत पवार, दत्तात्रय शिंदे, रणवीर देशमुख, शिवा पाटील यांनी केली आहे.

## गणेशोत्सवादरम्यान मंडप उभारणी सोबतच ढोल ताशासंदर्भात उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन व्हावे : ॲड. सूरज साळुंके

लातूर : गणेशोत्सव – नवरात्रोत्सवात रस्त्यावर मंडप उभारणी करताना संबंधितांनी रहदारीला कोणताही त्रास होणार नाही, याची काळजी घेऊन मंडप उभारावेत. व तसेच ढोल – ताशा, डीजे संदर्भात उच्च न्यायालयाने आखून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असुन न्यायालयाच्या निर्देशांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याबाबतचे आदेश उच्च न्यायालयाने प्रशासनास दिल्याची माहिती ड. सूरज साळुंके यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

गणेशोत्सव, आता तोंडावर आले आहेत. अशावेळी मंडपाची उभारणी करताना तो रस्त्यात येणार नाही, त्याचा वाहनधारकांना व पादचारी नागरिकांना त्रास होणार नाही याची काळजी संबंधितांनी घेणे गरजेचे असुन मंडप उभारणी करण्यापुर्वी आवश्यक त्या सर्व विहित परवानग्या घेणे आवश्यक असताना लातुर मधील काही गणेश मंडळ कोणतीही परवानगी न घेता रस्त्यावर मंडप उभारत आहेत. अशा मंडळावर गुन्हे दाखल करण्याबाबतचे निर्देश उच्च न्यायालयाने दिले आहेत. व तसेच उत्सवादरम्यान ढोल – ताशा , डीजेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण होत असल्याने ध्वनी प्रदूषण नियंत्रणात ठेवण्यासाठी उच्च न्यायालयाने आखून दिलेली ध्वनी मर्यादा पाळणे बंधनकाराक असताना व यासाठी प्रतिबंधात्मक कायदे अस्तित्वात असताना देखील स्थानिक प्रशासन राजकीय दबावामुळे कार्यवाही करण्यास टाळाटाळ करित असल्याने उत्सवादरम्यान न्यायालयाच्या आदेशानव्ये कार्यवाही न करणाऱ्या प्रशासकीय व पोलीस अधिकाऱ्यांवरही कायदेशीर कार्यवाही करणार असल्याचे न्यायालयाने त्यांच्या आदेशात स्पष्टपणे नमुद केले आहे.

लातूर शहरात मुख्य रस्त्यावरील दुभाजकात उभारण्यात आलेल्या नियमबाह्य युनीपोल/जाहीरात फलक संदर्भांत बोलताना आशिष कोकाटे यांनी सांगितले की, या जाहिरात फलकाच्या उभारणीबाबत कोणत्याही नियमांचे पालन संबधित कंत्राटदाराने केलेले नसून सदर जाहिरात फलकाची उभारणी करताना हे फलक नेमके किती प्रमाणात असले पाहिजेत याचेही पालन केले गेलेले नाही. त्यामुळे रस्त्या वरिल वाहनधारकांच्या व नागरिकांच्या जिवीतास धोका निर्माण होत असल्याने याची जाणीव राज्याच्या मुख्यमंत्र्यांसह औरंगाबाद विभागातील सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांना निवेदन व तक्रार अर्जाच्या माध्यमातून करून देण्यात आली आहे. केवळ एवढेच नाही तर लातुरात हे जाहिरात फलक उभारणी करताना उच्च न्यायालयाच्या आदेशाचा देखील अवमान संबंधितांकडून करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. या बाबत मनपा प्रशासनाकडे निवेदन देऊनही संबंधितांविरुद्ध कोणतीही कारवाई होत नाही हे आश्चर्यकाराक असल्याचे नमुद करुन मनपाकडून पुढील आठ दिवसात यावर कठोर कारवाई न झाल्यास यासंदर्भातही उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करणार आसल्याचे कोकाटे यांनी स्पष्ट केले. उच्च न्यायालयात याचिकाकर्ता ड. सूरज साळुंके यांच्यातर्फे ड. प्रियंका शिंदे व ड. प्रशांत जाधव यांनी बाजू मांडली

माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते

## खर्डेकर स्टॉप परिसरातील न्यू टाऊन हॉस्पिटलचे उद्घाटन



लातूर /प्रतिनिधी :–राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते आज गुरुवार दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी लातूर शहरातील खर्डेकर स्टॉप परिसरातील डॉ. अतुल शिवहर उत्के व डॉ. प्रियंका अतुल उत्के यांच्या न्यू टाऊन हॉस्पिटलचे उद्घाटन करण्यात आले, यावेळी आमदार अमित विलासराव देशमुख यांनी हॉस्पिटलची पाहणी करून डॉ. उत्के यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी महापौर दीपक सूळ, लातूर शहर जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष किरण जाधव, दिशा प्रतिष्ठानचे अभिजीत देशमुख, विलास को–ऑपरेटिव्ह बँकेचे व्हा.चेअरमन समद पटेल, वी.बी.पाटील, डॉ. अजय मैंदरकर, डॉ. इंद्रजीत लकडे डॉ. आदित्य महाजन लातूर शहर युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष इम्रान सय्यद, ज्येष्ठ पत्रकार संजय जेवरीकर, शिवहर उत्के, विजय राऊत, सुतेज माने, गणेश एसआर देशमुख, राहुल उत्के, दत्तात्रय जाधव, श्रीशैल्य गडगडे, विजय टाकेकर आदिसह कॉंग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी उत्के कुटुंबीय मित्रपरिवार उपस्थित होते.

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित,
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर
नॅक पुनर्मुल्यांकन "अ" दर्जा प्राप्त
कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय

| | | |
|---|---|---|
| कनिष्ठ विभाग | : | कला, वाणिज्य, विज्ञान, उ.मा. व्यवसाय अभ्यासक्रम शाखा |
| पदवी विभाग | : | बी.ए., बी.कॉम,. बी.एस्सी., समाजकार्य, बीसीए |
| पदव्युत्तर विभाग | : | एम.ए. (इतिहास, भूगोल, तत्त्वज्ञान, राज्यशास्त्र, समाजशास्त्र) एम.एस्सी. (गणित) |
| संशोधन केंद्र | : | भूगोल, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र |





मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त आणि
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त
५३ वर्षांची यशस्वी उज्वल परंपरा असलेल्या
महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातर्फे हार्दिक शुभेच्छा..!
* शुभेच्छूक *
प्रा.डॉ. राजकुमार लखादिवे
उपप्राचार्य
डॉ. संजय दुर्वासराव गवई
प्रभारी प्राचार्य

## साखर उद्योग भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मजबूत कणा

पुणे : प्रतिनिधी–साखर उद्योग हा भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मजबूत कणा असून ग्रामीण जनतेच्या सामाजिक आणि आर्थिक उन्नतीमध्ये त्याने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. इथेनॉल, बायो–सीएनजी आणि हायड्रोजन हे भारताच्या अक्षय्य ऊर्जा कार्यक्रमातील नवीन क्षितिजे असून त्यांचा वापर करण्याची उपजत क्षमता साखर उद्योगात आहे. त्यामुळे भारताच्या अक्षय ऊर्जा अभियानाला गती देऊन सक्षम ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या उभारणीत साखर उद्योग आपला ठसा उमटवेल,असे कोजनरेशन असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष, ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी सांगितले.

कोजनरेशन असोसिएशन ऑफ इंडियातर्फे आयोजित 'साखर कारखाना संकुलांच्या हरित आणि अक्षय्य उर्जेसाठी एकात्मिक धोरण' या विषयावरील एकदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन आणि राष्ट्रीय कोजनरेशन पुरस्कारांचे वितरण पवार यांच्या हस्ते झाले.

## संपादकीय....

# सुशिक्षित बेरोजगारांना संधी कधी मिळणार?

शासकीय सेवेतून निवृत्त होऊन सुद्धा पुन्हा त्यांनाच विविध ठिकाणी कामाच्या संधी दिल्या जात असतील, तर सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी कधी मिळणार हा खरा प्रश्न आहे. तेव्हा या प्रश्नाचे उत्तर शोधत बसण्यापेक्षा जे तरूण सुशिक्षित बेरोजगार आहेत. त्यांना पूर्ण वेतनी पगाराची नोकरी दिली गेली पाहिजे. कारण आपला देश हा तरुणांचा देश आहे, असे देशाचे प्रधानमंत्री सांगतात. त्यामुळे आपल्या देशात वाढणाऱ्या सुशिक्षित बेरोजगारांचा विचार करता देशातील राज्यकर्त्यांनी सुशिक्षित बेकारांचा नोकरीचा विषय गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. त्यासाठी सुशिक्षित बेकार कोणाला म्हणतात, हे समजून घेऊ.

'आपल्या देशातील ज्या व्यक्तीने शिक्षण घेतले असेल, त्याची काम करण्याची इच्छा, शक्ती व पात्रता असून त्याला काम मिळत नसेल, तर अशा व्यक्तीला सुशिक्षित बेकार असे म्हणतात. यामध्ये दहावी, बारावी, विविध कोर्स, अध्यापक पदवी, पदवीधर व पदव्युत्तर असे शिक्षण घेतलेल्या व्यक्तीला जर काम मिळत नसेल, तर त्या व्यक्तीला सुशिक्षित बेकार असे म्हणतो. आज आपल्या देशात सुशिक्षित बेकारांची संख्या वाढताना दिसत आहे.

देशात तसेच राज्यात ज्याप्रमाणे शिक्षण घेतले जाते. त्याप्रमाणात काम मिळाले पाहिजे. ही शासनाची जबाबदारी आहे. समजा असेच चालले, तर पुढच्या पिढीचे काय? जर पदव्या घेऊन सुद्धा योग्य पगाराची नोकरी मिळत नसेल, तर त्या पदव्या घ्याव्यात का? असा प्रश्न तरुणांपुढे निर्माण होत आहे. तेव्हा असा प्रश्न आजच्या तरुणांपुढे निर्माण होऊ नये म्हणून योग्य उपाय सुचवून त्यांची योग्य प्रकारे अंमलबजावणी करणे देशाच्या हिताच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. आजचे तरुण हे उद्या देशाचे सुजाण नागरिक आ-हेत. सुजाण नागरिक होण्यासाठी उच्च शिक्षण आणि त्याला अनुसरून असणारी नोकरी मिळायला हवी. यातून देशाचा आर्थिक विकास होत असतो. सध्या तर राज्याच्या आर्थिक परिस्थितीचे कारण पुढे करीत हंगामी नोकर भरती खासगी नऊ कंपन्यांच्या माध्यमातून केली जात आहे. यामध्ये इन-ोवेव आयटी, सैनिक इंटलिजन्स, सिंग इंटलिजन्स, एस-२ इन्फोटेक, उर्मिला इंटरनॅशनल, क्सेंट टेक, सी.एस.सी.ई. गव्हर्नन्स, क्रिस्टल इंडग्रेटेड आणि सी.एम.एस.आयटी यांचा समावेश आहे. आता सांगा यातल्या महाराष्ट्रातील किती कंपन्या आहेत याचा शोध आपण लावा.

कोकण विभागातील सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विचार करता जिल्ह्यात १२१ प्राथमिक शाळांमध्ये शिक्षकच नाही. यात देवगड तालुक्यात अधिक शाळा आहेत. अशी परिस्थिती जिल्ह्यात असताना त्याच जिल्ह्यातील डी.एड. व बी.एड. पदवीधारक नोकरीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसण्याची वेळ येते. मात्र त्याच जिल्ह्यातील निवृत्त शिक्षकांना ज्याशाळेत शिक्षक नाहीत अशा शाळेवर हजर रहाण्यासाठी शिक्षण विभाग आदेश देतात. याला काय म्हणावे? आता तर काही ठिकाणी एक व्यक्ती एका ठिकाणी पूर्णवेळ अधिकारी पदावर काम करीत असताना सुद्धा त्यांना अन्य खात्याची जबाबदारी दिली जाते. मागे तर माझा एक मित्र सांगत होता की, एका व्यक्ती जवळ आठ खात्यांचा कारभार आहे. आता सांगा देशात सुशिक्षित बेकारांची संख्या वाढत असताना असा अतिरिक्त भार एकाच व्यक्तीकडे देणे योग्य वाटते का? मग सांगा सुशिक्षित बेरोजगारांना संधी कशी मिळणार. त्यांच्या कारभारामध्ये पारदर्शकता अशी येणार. यातून आर्थिक विकास होणार का? मग हंगामी भरती का? यामुळे आर्थिक विषमता वाढण्याला मदत होणार. यातून गरीब अधिक गरीब होत जाणार, तर श्रीमंत अधिक श्रीमंत होत जाणार ही वस्तुस्थिती आहे.

१ नोव्हेंबर,२००५ पासून शासकीय सेवेत लागणाऱ्या सेवकांना निवृत्ती वेतन नाही. मग सांगा शिक्षण घेऊन नोकरी करून सुद्धा म्हातारपणी कुणाचा आधार घ्यावा असा प्रश्न कायम त्यांना सतावत असतो. मग कंत्राटी पद्धतीने होणाऱ्या सेवकांची काय दशा होईल, याचे वर्णन न केलेले बरे. तेव्हा सुशिक्षित बेकार आहेत. त्यांना आधार देणे आवश्यक आहे. याचा परिणाम दारिद्र्यरेषेखालील लोकांची सुद्धा संख्या वाढेल. तेव्हा राज्यातील राज्यकर्त्यांनी राज्यातील सुशिक्षित बेकारांकडे दुर्लक्ष करून विकास कामांकडे लक्ष देऊन राज्याचा विकास होणार नाही, तर राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना त्यांनी घेतलेल्या पदवीप्रमाणे किमान वेतन देणारा रोजगार त्यांना दिला गेला पाहिजे, तरच राज्याचा विकास होऊ शकतो.

एक शासकीय सेवक घर संसार सांभाळूण गाव व पाहुणे मंडळी सांभाळीत असतात. इतकेच नव्हे, तर एखाद्याच्या सुखदुःखात एकमेकांना मदत करतात. पगार जरी पाच किंवा सहा अंकी असला तरी जवळ जवळ त्यातील तीस टक्के पगार शासन दरबारी जातो. उरलेल्या पगारात मुलांचे शिक्षण, घराचा हप्ता, आजारपण, कपडालत्ता आणि उत्सव वर्गणी मग आता शिल्लक किती? यात अनेक कर्जबाजारी झालेले दिसतात, तर काही व्यसनाच्या आहारी गेले. तेव्हा विकासासाठी प्रथम बेकारांना कामधंदा दिला पाहिजे. जर देता आला नाही तरी महागाईच्या निर्देशांकानुसार त्यांना बेकारी भत्ता दिला गेला पाहिजे. मग बघा कसा विकास होतो ते. राज्याच्या विकासासाठी कंत्राटी नोकरभरती फायदेशीर नाही, तर किमान वेतन देऊन नोकरीची शाश्वतीही देता आली पाहिजे. आज ज्या घरफोड्या व लुटमार होतात हे त्याचेच उदाहरण आहे. थोडक्यात असे म्हणता येईल की, देशात किंवा राज्यात सुशिक्षित बेरोजगारांची क्रूर थट्टा चालली आहे. तेव्हा आपल्या राज्याच्या विकासासाठी हे चित्र बदलणे आवश्यक आहे. एक व्यक्ती एक पद,आरक्षणाची अंमलबजावणी आणि निवृत्तीनंतर निवृत्तिवेतन, तरच सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराची संधी मिळून आपला भारत देश बलवान होईल. त्यासाठी देशातील सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी मिळणे गरजेचे आहे.

# कंत्राटी नोकरी, भांडवलदारांची चाकरी


भारताने लोकशाही चा स्विकार करून सत्तरवर्षे पुर्ण केली. लवकरच आम्ही लोकशाही चा अमृतमहोत्सव साजरा करू. लोकशाहीचा स्विकार करून आता पंचेहत्तर वर्ष पुर्ण होताना ही मात्र लोकशाही व संविधान हे अजूनही लोकांना कळाले नाही. देशाचे संविधानच लोकांना न कळणे हि खुप मोठी शोकांतिकाच नाही तर देशासोबत केलेला द्रोह असुन आम्ही नैतिक दृष्टीने अडाणी आहोत याचे लक्षण आहे. भारतीय संविधानाला जगात एक आगळे वेगळे महत्त्व आहे. कारण भारतीय संविधानाने हज-ारो वर्षापासून चालत आलेली विषमता, थोतांड व गुलामीची व्यवस्था उलथून समता बंधुता न्याय, स्वातंत्र्य शिक्षण व हक्क अधिकार बहाल करून प्रत्येक नागरिकांना सारख्याच प्रमाणात सक्षम केले. परंतु याची जाणीव अनेकांना नाही. देशामध्ये लोकशाही लागु झाली आणि देशाचा कारभार सर्व सामान्य लोकांच्या हाती येण्याचा मार्ग मोकळा झाला. परंतु प्रत्यक्षात आपण जर बघितले तर सर्वसामान्य लोकांना लोकशाहीचा आजही अर्थ पाहिजे तसा कळाला नाही. म्हणून लोकशाहीचा फायदा ज्या लोकांना व्हायला पाहिजे होता तो समुह आजही लोकशाही पासून खुप दूर आहे. हे सत्य नाकारू शकत नाही. एकिकडे लोकशाहीचा स्विकार करून शासन प्रशासनामध्ये प्रत्येक भारतीयांना समान संधी व समान दर्जा निर्माण करून सत्तेतही सहभागी होण्याचा अधिकार भारतीय संविधानाच्या माध्यमातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बहाल केला. संविधानाने भारतीयांना हक्क अधिकार बहाल तर केलेच परंतु त्यांचे मजबूत संरक्षण सुद्धां करून दिले म्हणजे काहीही झाले तरीही नागरिकांचे मुलभूत हक्क कमी करता येणार नाहीत. आणि दुसरी गोष्ट म्हणजे कल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकारून शेवटच्या घटकाचा विकास करणेही सरकारचे काम आहे असे संविधान सांगते. तरीही आजही देशातील नागरिकांच्या समस्या कमी न होता वाढत जात आहेत. तर या मागचे मुळ कारण काय हे समजून घेणेही गरजेचे आहे. काही सत्य गोष्टी पचणी पडत नाहीत म्हणून, मनाला पटत नाहीत तरीही त्यावर बोलणे प्रबोधन करणे आवश्यक आहे. स्वतःला शिक्षीत समजणाऱ्या लोकांना ही सत्य गोष्टी मनाला पटत नाहीत म्हणून काल्पनीक गोष्टींना सत्य समजतात व जगतात. कारण काल्पनीक गोष्टींना सत्य माणणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे. आणि काल्पनिक गोष्टींमधून कुठेतरी मनात भीती निर्माण करून दिली आहे. म्हणून बरेच लोक काल्पनिक बाबीं सत्य समजतात पण अशा ठिकाणी शिक्षणाचा फायदा काय? शिक्षणाने माणूस जागृत तर्कवादी बनुन सत्याचा स्विकार करून चुकिचे व काल्पनिक बाजूला सारून आदर्श जिवन जगतो तो सुशिक्षित असतो. असो सुशिक्षित माणुसही जागृत व तर्कवादी का नाही बनला हेच बघने आवश्यक आहे. भारतात हजारो वर्षांपासून जातीच्या नावाखाली विषमता, थोतांड, अंधविश्वास पाखंड निर्माण करून त्याआधारे स्वतः चे वर्चस्व निर्माण करून पोट भरण्याचे काम काम काही माणुसकी नसलेल्या लोकांकडून केल्या गेले. माणसाला माणूस म्हणून कधीच एकत्र येऊ न देता प्रत्येक जातीचा फायदा मात्र स्वतः साठी करून घेणारे धुर्त लोकांनी शिक्षण हक्क अधिकार व सर्वांगीण विकासापासून दुरच ठेवले. संविधानाच्या माध्यमातून हे बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मोडून जरी काढले तरीही जातीय विषमता, अस्पृश्येतेची घाण डोक्यात असलेल्या लोकांनी कधीच भारतीय संविधान व बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना समजून घेतलेच नाही. शिक्षणाचा गंधही नसणाऱ्या, कोणताही हक्क अधिकार नसताना, संविधानाच्या अगोदर कुटुंबातील कोणीही सत्तेत वा लाभाच्या पदावर नसताना, एवढेच काय तर शेतजमीन भरून असुन, गजगंड श्रीमंत असुन गावातील शेतीचा हिशोब व शेतसारा गोळा करण्याचा ही अधिकार नसणाऱ्या लोकांना भारतीय संविधानाने राजकारणात आमदार खासदार केले, मंत्री केले. प्रशासनात मोठ्या पदावर अधिकारी, सचिन झाले हे केवळ संविधानामुळेच. परतुं एवढ्या मोठा पदावर गेल्यानंतर ही संविधान व बाबासाहेब वाचले नाही कारण डोक्यात कायम जात आहे. आज प्रत्येक जन इतर जा-तीला कमी समजून स्वतःला श्रेष्ठ समजून स्वतः चीच पाठ थोपटण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु सत्य परिस्थीती बघितली तर संविधानाचे मोठ मोठ्या हुद्यावर बसुन, लाखों रुपयांचे पगार घेऊन, स्वतः च्या कुटुबांची काळजी घेणारे, सोबत पेन्शन व इतर सुविधा घेऊन निवृत्तीनंतर ही आपले जिवन अगदी सुखा समाधानाने जगुन नोकरी चा थाट सांगणारे लोक संविधान समजून सांगत नाही तेव्हा त्यांच्या अज्ञानाची किव येते. ज्यांना समता बंधुता, न्याय, हक्क अधिकार इतरांना मिळूच नये असे वाटत होते पण डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून बहाल करून दिले. पण विषमतावादी लोक यांनी देशातील लोकांच्या डोक्यात डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधान जाऊच दिले नाही. शिकलेल्या लोकांनाही ते समजून च नाही म्हणून जाती धर्माच्या नावाखाली मानसिक गुलाम बनवून संविधान, डॉ बाबासाहेब आंबेडकर, आणि आरक्षण विरोधी विचार लोकांच्या मनात रूजवले व स्वतः शिकलेले, संविधानामुळे बोलायला लागलेले, आरक्षणामुळे च नोकरी वर लागुन उच्च पदावर गेलेले लोक प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पणे संविधान, डॉ बाबासाहेब आंबेडकर व आरक्षणाच्या विरोधात बोलायला लागले तेव्हा यांचा बौद्धिक विकास झालाच नाही हे लक्षात आले. याचाच फायदा याच लोकांविरुद्ध कट कारस्थान करण्यासाठी विषमतावादी लोक घेत आहेत. याची जाणीव आजही लोकांना नाही हि खरी खंत आहे. लोकांच्या समस्या वाढवून सुद्धा लोक बोलत नसतील तर हे गुलामीचे लक्षण आहे. म्हणूनच आरक्षणाचे गाजर दाखवून जनतेची दिशाभूल करून संविधानाने दिलेल्या कायमस्वरूपी नोकरी, आरोग्य सुविधा, शिक्षण, पेंन्शन सर्व काही बंद करून टाकले तरीही लोकांना चिड आली नाही. विषेश म्हणून ज्यांच्या कडे काहीच नव्हते त्यांना संविधानाने शिक्षण, कायमस्वरूपी नोकरी, आरोग्य सुविधा, लाखों रुपयाचा पगार व पेंन्शन दिले. एवढे घेऊनही लोकांना संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर कळाले नाही म्हणून आज विषमतावादी लोकांनी संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले सर्व काही बंद करत आहेत. शासकीय नोकरी बंद करून कंत्राटी पद्धतीने नोकर भरती करणार म्हणजे पुन्हा देशातील लोक भांडवलदारांचे गुलाम होणार. देशातील संवेदनशील व गुप्त माहिती भांडवलदारांच्या हाती जाणार. फुट भर जागेसाठी भावा भावात भांडणे करणारे, शे पाचशे रुपये कोणाला दिले तर वारंवार माघणारे लोक देशातील संपती ही केवळ मुठभर लोकांच्या हाती जात असताना आणि संपतीचे मुळ मालक भिकारी होत असताना ही शांत आहेत. याचा अर्थ गुलामी खा-`लवर गेली आहे. आज आपण बोलु शकतो, लिहु शकतो. आंदोलन करू शकतो तरीही लोक घरात बसले आहेत. स्वतः चे चांगले जिवन जगणाऱ्यांना येणाऱ्या पिढीची काळजी दिसत नाही. कंत्राटी कामगारांची भरती झाली तर पगार कमी, नोकरीची हमी नाही, सुरक्षेतेची हमी नाही, इतर सुख सुविधा नाही. भांडवल दार लोकांच्या विरोधात बोलु शकणार नाही. जो भांडवलदार लोकांच्या विरोधात बोलेल त्याला नोकरी मिळणार नाही. म्हणजे पोटभरण्यासाठी भांडवलदार लोकांची चाकरी करावी लागणार. आणि भारतीय संविधान सांगते तुम्ही या देशाचे मालक आहात. वडिलांचे निवृत्ती वेतन हे मुलांच्या पग-ारापेक्षा कमी आणि नोकरी ची हमी नसेल तरीही वडील आणि मुलगा यांच्या पैकी एकालाही व्यवस्थेची चिड येत नसेल तर ते कधीच गुलामी मधुन बाहेर येऊ शकणार नाही. कायमस्वरूपी नोकरी मध्ये हक्क अधिकारासाठी नोकरदारांना लढता येत होते. कंत्राटी मध्ये लढणे सोडा बोलताही येणार नाही. अशी परिस्थिती आपण स्वतः च्या अंगावर ओढावून घेतली आहे. आणि यासाठी जर आजही आवाज उठवला नाही तर भांडवलदार लोक सर्वसामान्य माणसाला लाचार बनवल्या शिवाय सोडणार नाहीत. भांडवलदार लोकांची चाकरी करायची तर लोकशाही कुठे जिवंत राहणार? लोकशाही मध्ये सार्वजनिक मालमत्ता ही जनतेच्या मालकीची असते. जनतेचेच प्रतिनिधी सरकार चालवत असतात. सरकारच आपल्या कर्मचारी अधिकारी यांची निवड करत असते. जर कंपनी कर्मचारी अधिकारी यांची निवड करेल, कंपणी पगार देईल तर मग ही भांडवलशाही झाली. मुळात डोक्यात विषमतावादी लोकांनी टाकलेले संविधान, डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि आरक्षण या बद्दलचे चुकिचे विचार बाजूला काढून जातीची घाण बाजूला फेकून येथे माणसाला शिक्षण, आरोग्य हक्क अधिकार पाहिजे व जिवन जगण्यासाठी कायमस्वरूपी नोकरी पाहिजे आणि कोणत्याही जातीला नाही तर देशात राहणाऱ्या लोकांना पाहिजे हि भावना मनात रुजून जोपर्यंत समता बंधुतेची उर्जा निर्माण होणार नाही. तोपर्यंत सत्य कळणार नाही. म्हणजे माणसाच्या समसस्येवर माणसाने जागृत झाले पाहिजे. आज पर्यंत जात धर्म पाहून राजकीय नेत्यांना निवडून दिले त्या नेत्यांनी स्वतः ची भरभराट करून घेतली, स्वतः ला लाखों रुपयांचे पगार व पेंन्शन वाढवून घेतले आणि तेच लोक आज एका सरकारी पगारावर कंत्राटी मध्ये तिन लोक काम करू शकतात तर तो जनतेचा प्रतिनिधी नाही कंपनीचा प्रतिनिधी आहे. जनतेचे प्रतिनिधी जनतेच्या बाजुने बोलतात. परंतू शिक्षण, रोजगार, आरक्षण, यावर कोणीही बोलताना दिसत नाही. पेन्शन बंद , कायमस्वरूपी नोकरी बंद करणारे नेते जनतेचे असुच शकत नाहीत. जनतेचे प्रतिनिधी म्हणून सर्व सामान्य जनतेला भांडवलदाराच्या दावणीला बांधायचे काम सुरू केले आहे. एवढी गंभीर समस्या असुनही जर आज संविधान आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर समजून घेतले नाही तर येणाऱ्या काळात गुलामी ठरलेलीच समजा. राजकीय नेत्यांना वठणीवर आणण्यासाठी आणि लोकशाही जिवंत ठेवून जनतेचे खरे प्रतिनिधी सत्तेत बसवण्यासाठी ईव्हीएम बंद करून पेपर वर निवडून घेण्याचा आग्रह धरा म्हणजे आपले हक्क अधिकार वाचतील व भांडवलदार लोकांची चाकरी करायची वेळ नाही.

----------

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता. मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# चैत्यभूमीचे शिल्पकार आणि बौद्धाचार्यांचे जनक भैय्यासाहेब आंबेडकर..!

यशवंत भीमराव आंबेडकर( जन्म १२ डिसेंबर १९१२- मृत १७ सप्टेंबर १९७७ ) भैयासाहेब आंबेडकर या नावाने महाराष्ट्रासह भारतभर सामाजिक, राजकीय, कार्यकर्ते राजकारणी व बौद्ध चळवळीचे कार्यकर्ते म्हणून सुपरीचित आहे.



भैय्यासाहेब आंबेडकर हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या पत्नी रमाबाई आंबेडकर यांचे प्रथम एकमेव पुत्र होय. असं म्हणतात की विशाल पिंपळाच्या किंवा वडाच्या झाडाखाली दुसरे कोणतेच झाड उगवत नाही. किंवा वाढत नाही, म्हणजेच एका थोर महापुरुषाच्या कुटुंबात दुसरा महा-पुरुष जन्माला येऊ शकत नाही. मात्र महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वारस म्हणून भैयासाहेब आंबेडकर यांनी समाजात स्वतः चे स्वातंत्र व्यक्तिमत्व निर्माण केले. बाबासाहेबांच्या एवढे त्यांच व्यक्तिमत्व जरी असामान्य नसले तरी त्यांच्या शांत संयमी सहनशील आणि वैचारिक बुद्धिमत्तेच्या जोरावर त्यांनी बाबासाहेबांचं कार्य पुढे नेण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. भैय्यासाहेब आंबेडकर यांचे प्राथमिक शिक्षण हे मुंबईमध्येच झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर यशवंतरावांनी म्हणजेच भैयासाहेब आंबेडकरांनी स्वतः ला धम्मकार्यासाठी झोकून दिले आणि बाबासाहेबांच्या सामाजिक समतेचे काम महाराष्ट्रासह भारतभर अखंड सुरू ठेवले १९ एप्रिल १९५३ रोजी त्यांचे लग्न मिराबाई यांच्यासोबत झाले. बाबासाहेबांच अपूर्ण राहिलेलं कार्य पूर्ण करण्यासाठी भैय्यासाहेबांनी बाबासाहेबांच्या चळवळीत भाग घेण्यास सुरुवात केली. त्यांनी प्रथम बंद पडलेला भारत भूषण प्रिंटिंग प्रेस हा छापखाना सुरू केला.पुढे या प्रेसचे बुद्धभूषण प्रिंटींग प्रेस असे नामकरण झाले. साधारणता १९४४ पासून बाबासाहेबांच्या जनता, प्रबुद्ध भारत या मुखपत्राचे व्यवस्थापन तेच पाहत होते. बुद्धभूषण प्रेस मध्ये बाबासाहेबांचा थॉट्स ऑन पाकिस्तान हा इंग्रजी ग्रंथ भैय्यासाहेबांनी छापला होता. बाबासाहेब यांच्या सूचनेवरून त्यांनी वा.गो.आपटे लिखित 'बौद्ध पर्व हा ग्रंथ ही आपल्या छापखाना मध्ये छापून प्रसिद्ध केला. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणानंतर भारतीय बौद्ध महासभेतर्फे दादासाहेब गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली एका मताने भैयासाहेब आंबेडकर यांची भारतीय बौद्ध महासभेचे द्वितीय अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. सामाजिक एकता टिकून राहावी म्हणून तरुण भैय्यासाहेबांनी संपूर्ण महाराष्ट्र सह देशभर दौरा केला व संपूर्ण भारतभर बौद्ध धर्मांतरांच्या मोठ्या सभा घेतल्या ग्रामीण भागात बुद्ध विहाराची निर्मिती केली. नव्याने समता सैनिक दलाची उभारणी केली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेली संघटना कमकुवत होऊ नये म्हणून भैय्यासाहेबांनी आपल्या शारीरिक व्याधीकडे दुर्लक्ष करून जी-वाची बाजी लावून समाजासाठी अहोरात्र कार्य केले. सण १९६८ मध्ये भारतीय बौद्ध महासभेचे भारतातील पहिले राष्ट्रीय अधिवेशन मुंबई येथे भरवले या अधिवेशनाला प्रमुख अतिथी म्हणून बौद्धांचे धर्मगुरू दलाई लामा यांना निमंत्रित केले. बौद्ध विवाह संस्कार,पूजा विधीसाठी बौद्धाचार्य या पदा-ची निर्मिती केली. बाबासाहेबांची गाव खेड्यात अनेक बुद्धविहार, पुतळे उभी राहिली कारण बाबासाहेबांवर जनतेची अपार श्रद्धा होती.



परंतु मुंबई येथे चैत्यभूमीच्या नावाने उभारण्यात येणारे भव्य स्मारक पूर्ण होत नव्हते. निधी पाहिजे त्या प्रमाणात गोळा होत नव्हता हे ओळखून भैया साहेबांनी लोकांना चैत्यभूमीच्या निर्मितीसाठी भरून निधी द्या असे आव्हान केले. ती जबाबदारी भैय्यासाहेबांनी आपल्या खांद्यावर घेतली त्यासाठी त्यांनी मध्य प्रदेशातील बाबासाहेबांचे जन्म ठिकाण ' महू ' या गावापासून चळवळतील आपल्या अनेक सहकाऱ्यांना सोबत घेऊन भव्य भीम ज्योत पदयात्रा काढली मध्य प्रदेशा-तून नागपूर पुणे मार्गे मुंबईला ही भीम ज्योत आणली या प्रवासात जो निधी मिळाला त्या निधीतून बाबासाहेबांचे दादरच्या चैत्यभूमीवर मोठे स्मारक बांधले म्हणून भैय्यासाहेबांना आंबेडकरी चळवळीत चैत्यभूमीचे शिल्पकार म्हणून ओळखल्या जाते. भैय्यासाहेबांनी केलेल्या अपार कष्टांमुळेच देशभर भारतीय बौद्ध महासभा समता सैनिक दलाचे कार्य आज रोजी टिकून आहे. आज बाबासाहेबांच्या नावाचा संघटनाचा पक्षांचा चुकीच्या पद्धतीने वापर करून स्वतःचा स्वार्थ साधून घेण्यात अनेक जण गुंतलेले आहे . जर एक वारसा म्हणून भैय्यासाहेबांनी बाबासाहेबांच्या ना-वाचा वापर केला असता तर त्यांना हवं ते राजकीय पद मिळू शकले असते. अफाट संपत्ती प्रसिद्धी मिळवता आली असती. मात्र भैय्यासाहेबांनी तसं न करता अतिशय साध आयुष्य ते जगले. बौद्धाचार्याचे जनक... भारतीय बौद्ध महासभेचे द्वितीय अध्यक्ष... विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे एकनिष्ठ सूर्यपुत्र यशवंत तथा भय्यासाहेब आंबेडकर यांच्या १७ सप्टेंबर स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या स्मृती आणि कार्याला विनम्र कोटी कोटी अभिवादन...

----------

लेखक- सिद्धार्थ अशोक तायडे
मु. पो. वडनेर भोलजी
ता. नांदुरा जि. बुलढाणा.
मो. नं. ९३०९७६७३८८

# मराठवाडा मुक्ती संग्रामातील योद्ध्यांचे योगदान

मराठवाडा मुक्ती दिन, दरवर्षी १७ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो, हा भारताच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण क्षण आहे. हा दिवस मराठवाड्यातील हैदराबादच्या निजामाच्या जुलमी राजवटीच्या अंताची आठवण म्हणून साजरा केला जातो. मराठवाड्यातील जनतेने आपल्या अटल निर्धाराने आणि पराक्रमाने या मुक्तीमध्ये मोलाची भूमिका बजावली. मराठवाडा मुक्ती दिनाचे ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व जाणून घेणे गरजेचे आहे.

ऐतिहासिक पार्श्वभूमी:

मराठवाडा मुक्तीचा इतिहास ब्रिटीश वसाहतवादी राजवटीपासून भारताच्या स्वातंत्र्याच्या व्यापक संघर्षाशी जोडलेला आहे. १९४७ पर्यंत बहुतेक भारताने स्वातंत्र्य मिळवले असताना, सातवा निजाम, मीर उस्मान अली खान यांच्या निरंकुश राजवटीत हैदराबादचे संस्थान अपवाद राहिले. हैदराबाद, त्याच्या लक्षणीय मराठी भाषिक लोकसंख्येसह, मराठवाड्याचा समावेश होता.

मुक्तीसाठी संघर्ष:

जुलमी निजाम राजवटीपासून मुक्तीच्या आवाहनाला १९४० च्या उत्तरार्धात वेग आला. स्वामी रामानंद तीर्थ, बिदर आंदोलन आणि मराठवाडा मुक्ती संग्राम यांसारख्या नेत्यांच्या नेतृत्वाखाली मराठवाड्यातील लोक त्यांच्या हक्क आणि स्वातंत्र्याच्या मागणीसाठी एकत्र आले. जुलमी सरंजामशाही व्यवस्था, प्रतिनिधित्वाचा अभाव आणि मानवी हक्कांचे उल्लंघन यामुळे मुक्तीची इच्छा वाढली.

सप्टेंबर १९४८ मध्ये, ऑपरेशन पोलो, भारत सरकारच्या नेतृत्वाखालील लष्करी कारवाई, हैदराबादला भारतीय संघराज्यात जोडण्यासाठी सुरू करण्यात आली. ही मुक्ती मिळवण्यात मराठवाड्यातील जनतेने भारतीय सैन्याला मदत करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. या काळात त्यांनी दिलेले बलिदान आणि शौर्य मराठवाडा मुक्ती दिनी स्मरणात ठेवले जाते.

सामाजिक आणि सांस्कृतिक प्रभाव:

मराठवाडा मुक्तीमुळे केवळ राजकीय स्वातंत्र्यच मिळाले नाही तर या भागातील सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीवरही त्याचा खोल परिणाम झाला. निजामाच्या राजवटीच्या समाप्तीमुळे मराठवाड्याचे भारतीय संघराज्यात एकीकरण झाले, ज्यामुळे आर्थिक विकास, सामाजिक सुधारणा आणि शिक्षण आणि आरोग्यसेवेमध्ये सुधारित प्रवेश मिळू शकला.

मराठवाडा हा प्रदेश कला, संगीत, साहित्य आणि पारंपारिक हस्तकलेचा इतिहास असलेला सांस्कृतिक वारसा संपन्न आहे. मुक्तीमुळे मराठी संस्कृतीच्या पुनरुत्थानाचा आणि प्रदेशातील सांस्कृतिक विविधतेच्या संवर्धनाचा मार्ग मोकळा झाला. सण, लोकनृत्य आणि कला प्रकारांना पुन्हा महत्त्व प्राप्त झाले, ज्यामुळे भारताच्या सांस्कृतिक मोज़ेकच्या संपूर्ण समृद्धीसाठी हातभार लागला.

वारसा आणि स्मारक:

मराठवाडा मुक्ती दिन हा लोकांच्या अदम्य भावनेला श्रद्धांजली म्हणून उभा आहे ज्यांनी त्यांचे स्वातंत्र्य सुरक्षित करण्यासाठी दडपशाही आणि अत्याचाराविरुद्ध लढा दिला. त्यांच्या बलिदानाचे स्मरण करण्याचा, त्यांच्या शौर्याचा सन्मान करण्याचा आणि लोकशाही मूल्ये, न्याय आणि समानता यांचे महत्त्व प्रतिबिंबित करण्याचा हा दिवस आहे.

ध्वजारोहण समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम आणि शैक्षणिक चर्चासत्रांसह स्मरणार्थ कार्यक्रमांचे आयोजन दरवर्षी संघर्षाच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी आणि तरुण पिढीला मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या ऐतिहासिक महत्त्वाबद्दल शिक्षित करण्यासाठी आयोजित केले जाते.

मराठवाडा मुक्ती दिन म्हणजे स्मरण आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. हे स्वातंत्र्यासाठी लढलेल्या असंख्य व्यक्तींनी केलेल्या बलिदानाचे स्मरण म्हणून काम करते. या मुक्तीचा वारसा पिढ्यांना प्रेरणा देत आहे, एकता, दृढनिश्चय आणि न्याय मिळवण्याच्या महत्त्वावर जोर देत आहे.

या दिवशी ध्वजारोहण समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम आणि शैक्षणिक चर्चासत्रांसह विविध कार्यक्रम आणि कार्यक्रम आयोजित केले जातात. हे उपक्रम संघर्षाच्या स्मृती जिवंत ठेवण्यास आणि भारताच्या इतिहासातील मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे महत्त्व तरुणांना शिक्षित करण्यास मदत करतात.

निजामाचे राज्य:

हैदराबादचा निजाम, मीर उस्मान अली खान, भारताच्या वसाहती काळात सर्वात शक्तिशाली राजेशाही शासकांपैकी एक होता. मराठवाड्याचा समावेश असलेले त्यांचे वर्चस्व निरंकुश शासन आणि सरंजामशाही प्रथा यांचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या राजवटीत मराठवाड्यातील लोकांचे आर्थिक शोषण, प्रतिनिधीत्वाचा अभाव आणि गळचेपीचे वातावरण होते.

मुक्ती संग्राम:

१९४० च्या उत्तरार्धात संपूर्ण भारतभर स्वातंत्र्याची तीव्र इच्छा दिसून आली. देशाचा बराचसा भाग ब्रिटीश वसाहतवादी राजवटीपासून स्वातंत्र्य मिळवत असताना, निजामाचे संस्थान अपवाद राहिले. मोठ्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीने प्रेरित होऊन मराठवाड्यातील जनतेने या जुलमी जोखडातून मुक्त होण्याचा संकल्प केला.

स्वामी रामानंद तीर्थ, बिदर चळवळ आणि मराठवाडा मुक्ती संग्राम या नेत्यांनी मुक्तीसाठी नेतृत्व केले. लवचिकता, धैर्य आणि त्यांचे हक्क सुरक्षित करण्यासाठी खोलवर रुजलेल्या दृढनिश्चयाने संघर्षाचे वैशिष्ट्य होते. मराठवाड्याने सप्टेंबर १९४८ मधील ऑपरेशन पोलो दरम्यान भारत सरकारला पाठिंबा देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली, ज्याचे उद्दिष्ट हैदराबादला भारतीय संघात समाकलित करण्याचे होते.

सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तन:

मराठवाडा मुक्तीमुळे केवळ राजकीय स्वातंत्र्य मिळाले नाही तर महत्त्वपूर्ण सामाजिक आणि सांस्कृतिक बदलही झाले. भारतीय संघराज्यात एकत्र येण्यामुळे आर्थिक विकास, सामाजिक सुधारणा आणि शिक्षण आणि आरोग्यसेवेमध्ये सुधारित प्रवेश झाला.

मराठवाड्याला एक समृद्ध सांस्कृतिक वारसा आहे, ज्यामध्ये कला, संगीत, साहित्य आणि पारंपारिक हस्तकला यांचा समावेश आहे. मुक्तीमुळे मराठी संस्कृती आणि वारसा पुनरुज्जीवित झाला, सांस्कृतिक विविधता आणि कलात्मक अभिव्यक्तीला चालना मिळाली.

हैदराबादच्या निजामाच्या जुलमी राजवटीतून मराठवाडा भाग मुक्त करण्याचे उद्दिष्ट असलेल्या मराठवाडा मुक्ती संग्रामात स्वातंत्र्याच्या लढ्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या असंख्य व्यक्तींचा सहभाग होता. येथे काही उल्लेखनीय व्यक्ती आहेत ज्यांनी या मुक्ती चळवळीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली:

स्वामी रामानंद तीर्थ:

स्वामी रामानंद तीर्थ हे मराठवाडा मुक्ती संग्रामचे प्रमुख स्वातंत्र्यसैनिक आणि नेते होते. निजामाच्या राजवटीतून मराठवाड्याच्या मुक्तीच्या लढ्यात जनतेला एकत्रित करण्यात आणि नेतृत्व करण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

बिदर चळवळीचे नेते:

सरदार पटेल पटेल आणि व्ही.पी. मेनन यांसारख्या नेत्यांच्या नेतृत्वाखालील बिदर चळवळीने हैदराबादचे भारतीय संघराज्यात एकीकरण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. मराठवाडा मुक्ती मिळवण्यासाठी त्यांचे राजनैतिक प्रयत्न आणि निजामाच्या सरकारशी वाटाघाटी महत्त्वपूर्ण होत्या.

वसंतराव नाईक: मराठवाडा विभागातील एक प्रमुख राजकीय नेते वसंतराव नाईक हे प्रादेशिक विकास आणि प्रतिनिधित्वाच्या चळवळीतील प्रमुख व्यक्तिमत्त्व होते. नंतर ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले आणि स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

दत्ताजी नलावडे: दत्ताजी नलावडे हे प्रसिद्ध स्वातंत्र्यसैनिक आणि मराठवाडा मुक्ती चळवळीतील एक प्रमुख नेते होते. प्रदेशातील लोकांना संघटित करण्यासाठी आणि त्यांना प्रेरित करण्यासाठी त्यांचे प्रयत्न महत्त्वपूर्ण होते.

डॉ. बी. आर. आंबेडकर:

भारतीय राज्यघटनेचे मुख्य शिल्पकार डॉ. बी. आर. आंबेडकर हे मराठवाडा भागातील रहिवासी होते. सामाजिक सुधारणा आणि राज्यघटना तयार करण्याच्या त्यांच्या भूमिकेसाठी ते अधिक प्रसिद्ध असले तरी मराठवाडा मुक्ती चळवळीतही त्यांचा प्रभाव आणि नेतृत्व जाणवले.

क्रांतिसिंह नाना पाटील:

क्रांतिसिंह नाना पाटील, महाराष्ट्रातील एक प्रमुख स्वातंत्र्यसैनिक, मराठवाडा मुक्ती संग्रामात सक्रियपणे सहभागी होते. स्वातंत्र्याच्या कारणासाठी त्यांनी केलेल्या समर्पणाने त्यांना या प्रदेशातील एक उल्लेखनीय व्यक्तिमत्व बनवले.

या व्यक्तींनी, इतर अनेकांसह, अपवादात्मक धैर्य आणि मुक्तीच्या कारणासाठी वचनबद्धतेचे प्रदर्शन केले. निजामाच्या जुलमी राजवटीपासून मराठवाड्याला स्वातंत्र्य मिळवून देण्यात आणि भारतीय संघराज्यात समाकलित करण्यात त्यांच्या सामूहिक प्रयत्नांनी आणि नेतृत्वाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. प्रदेशाच्या इतिहासात आणि भारताच्या स्वातंत्र्यासाठीच्या व्यापक लढ्यात त्यांच्या योगदानाबद्दल त्यांचे स्मरण केले जाते आणि साजरा केला जातो.

निष्कर्ष:



मराठवाडा मुक्ती दिन हा मराठवाड्यातील लोकांच्या अदम्य भावनेचा पुरावा आहे ज्यांनी आपले स्वातंत्र्य सुरक्षित करण्यासाठी दडपशाही आणि अत्याचाराविरुद्ध लढा दिला. त्यांच्या बलिदानाचे स्मरण करण्याचा, त्यांच्या धैर्याचा उत्सव साजरा करण्याचा आणि लोकशाही, न्याय आणि समानता या मूल्यांचे जतन करण्याचा हा दिवस आहे. आपण दरवर्षी या ऐतिहासिक दिवसाचे स्मरण करत असताना, मराठवाडा मुक्तीच्या वारशाने प्रेरित होऊन सर्वांसाठी न्याय्य आणि न्याय्य समाजासाठी कार्य करत राहू या.

-------------------------------

**नाव : श्रीमती रोमा रमेश सुरवसे**
**शाळा: जनता विद्या मंदिर प्रा.शाळामुरुड.**

# वर्कआउटनंतर नारळाचे पाणी आणि प्रोटीनचे करा सेवन ; आरोग्यासाठी मिळेल फायदा, वाचा तज्ज्ञांचा सल्ला

तुमच्यातील अनेक जण सकाळी लवकर उठून तंदुरुस्त राहण्यासाठी नियमित व्यायाम करतात. पण, व्यायाम करण्यासोबत पोषक आहार घेणंही तितकचं महत्वाचं असतं. अनेक जण नियमित व्यायाम तर करतात, पण व्यायाम केल्यानंतर हेल्दी अन्न खात नाहीत किंवा चुकीच्या पदार्थांचे सेवन करतात. यामुळे व्यायामाचा योग्य तो परिणाम आपल्या शरीरावर दिसून येत नाही. तर आज आम्ही तुम्हाला व्यायामानंतर कोणतं रिकव्हरी ड्रिंक पिण्यास योग्य आहे हे सांगणार आहोत. व्यायाम केल्यानंतर नारळाच्या पाण्यात पिवळ्या वाटाण्याची प्रोटीन पावडर मिसळणे ; हे पेय आरोग्यासाठी उत्तम ठरेल.द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना डॉक्टर लवनीत बत्रा आणि डॉक्टर निरुपमा राव यांनी नारळाच्या पाण्यासोबत प्रोटीनचे सेवन करणे आरोग्यासाठी कसे फायदेशीर ठरेल याची माहिती दिली आहे.

नारळाचे पाणी स्वादिष्ट आणि हेल्दी असते. त्यामुळे आपल्या शरीराला ऊर्जा मिळते. नारळाचे पाणी प्यायल्याने शरीर ताजंतवानं होतं. नारळ पाण्यात कॅलरीज अतिशय कमी असतात. मात्र, त्यामध्ये पोषक तत्वे मोठ्या प्रमाणात असतात. हे एक सुपर ड्रिंकच्या रुपात आपल्या शरीरात काम करते. तसेच अनेक डाळी या प्रोटीनचा उत्तम स्त्रोत आहेत. पिवळ्या आणि हिरव्या डाळींमधून शरीराला साधारण ९ ते १० ग्रॅमपर्यंत प्रोटीन मिळते. मूग, चण्याची डाळ प्रोटीनची कमतरता पूर्ण करतात. अनेक डाळींमधून प्रोटीन मिळवणे सहज शक्य होते. त्यामुळे वर्कआउटनंतर नारळाच्या पाण्यात, पिवळ्या वाटाण्याची प्रोटीन पावडर मिक्स करणे हे आरोग्यासाठी उत्तम पेय ठरेल. रेजुआ एनर्जी सेंटर, मुंबईच्या डॉक्टर निरुपमा राव या आहार तज्ज्ञांनी हे संयोजन विविध व्यक्तींसाठी योग्य ठरू शकते असे सांगितले आहे. तुम्ही जेव्हा व्यायाम करता तेव्हा शरीराचे स्नायू ताणले जातात. आणि व्यायाम करताना निघणारा घाम शरीरातले पाणी कमी करतो. यामुळे तज्ज्ञ एनर्जी ड्रिंक्स पिण्याचा नेहमीच सल्ला देतात. डॉक्टर निरुपमा राव यांनी स्पष्ट केले की, नारळाच्या पाण्यात पिवळ्या वाटण्याची प्रोटीन पावडर मिसळल्याने एक पेय तयार होते, जे वनस्पती आधारित प्रथिने नारळाच्या पाण्यातील हायड्रेटिंग आणि इलेक्ट्रोलाइट-समृद्ध गुणधर्मांसह एकत्र करते.

प्रथिनांचा योग्य तो वापर आहारात केल्याने तुमच्या फिटनेस उद्दिष्टांमध्ये त्याचा फरक पडू शकतो. असे म्हटले जाते की, पुरेशी प्रथिने आपल्या शरीरातील रोग बरे करण्यास आणि शरीराची शक्ती वाढवण्यास मदत करू शकतात. पोषणतज्ज्ञ डॉक्टर लवनीत बत्रा यांच्या मते, जर तुम्हाला तुमच्या आहारात पुरेशी आणि चांगल्या दर्जाची प्रथिने समाविष्ट करायची असल्यास 'पिवळ्या वाटण्याचे प्रोटीन' (धशश्रश्रे झशर र्झीीशळप) हा एक सोपा आणि जलद मार्ग ठरेल .

व्यायाम केल्यानंतर तुमच्या शरीरातील प्रथिनांची गरज १२–२५ ग्रॅमने वाढू शकते. तेव्हा तुम्हाला पिवळ्या वाटाण्याच्या प्रोटीन पावडरचा उपयोग प्रथिने मिळवण्यासाठी मदत करू शकतात. व्यायाम केल्यानंतर तुम्ही नारळाच्या पाण्यासोबत प्रोटीनचे सेवन केल्यास तुमचे शरीर समृद्ध होऊ शकते आणि प्रथिनांची कमतरतादेखील भरून निघू शकते.



डॉक्टर लवनीत बत्रा यांच्या मते, या पेयाचे सेवन केल्यास, डाळीतील उच्च प्रथिनांचे प्रमाण पोट साफ होण्यास, ग्लुकोजचे शोषण करणे तसेच भूक-नियंत्रणात आणण्यास मदत करते. ग्लायसेमिक इंडेक्स (ऋख) रक्तातील साखरेची पातळी स्थिर ठेवण्यास मदत करते. लठ्ठपणा कमी करते आणि ज्यांना मधुमेहाचा धोका आहे, त्यांना मात्र याचा फायदा होतो. कारण यातील अँटिऑक्सिडंट मधुमेह रुग्णांना फायदे देऊ शकते, असे डॉक्टर लवनीत बत्रा यांनी सांगितले आहे.

डॉक्टर निरुपमा राव यांनी नारळाचे पाणी आणि प्रोटीनचे सेवन का करावे, याचे काही फायदे पुढीलप्रमाणे सांगितले आहेत:

१. प्रथिने स्त्रोत : पिवळा वाटाणा प्रोटीन हे प्रथिनांचे शाकाहारी-अनुकूल स्त्रोत आहे, जे शाकाहारी आहेत किंवा शाकाहारी डाएट याचे पालन करतात, त्यांच्यासाठी हे योग्य ठरेल.

२. हायड्रेशन : नारळाचे पाणी हे पोटॅशियम आणि सोडियमसारख्या इलेक्ट्रोलाइट्सचे नैसर्गिक स्त्रोत आहे, जे व्यायामानंतर हायड्रेशन आणि इलेक्ट्रोलाइट यांची पातळी पुन्हा समतोल राखण्यास मदत करू शकते.

३. पौष्टिक विविधता : नारळाचे पाणी आणि पिवळ्या वाटाण्यांचे प्रोटीन; जीवनसत्तवे, खनिजे, हायड्रेशनसह पोषक तत्वांचे मिश्रण प्रदान करते, जे संपूर्ण आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते; असे डॉक्टर निरुपमा राव यांनी स्पष्ट केले आहे.

डॉक्टर निरुपमा राव यांच्या मते, नारळाचे पाणी आणि पिवळ्या वाटाण्यांचे प्रोटीन मिक्स करून तयार केलेलं हे पेय विविध व्यक्तींसाठी योग्य असू शकतं. शाकाहारी, क्रीडापटू किंवा जे लोक ताजेतवाने आणि पौष्टिक पेय घेऊ इच्छितात, त्यांच्यासाठी हा एक उत्तम पर्याय असू शकतो, असे डॉक्टर निरुपमा राव म्हणाल्या आहेत. .

साधारणपणे पिवळ्या वाटण्याचे प्रोटीन बहुतेक लोकांसाठी सुरक्षित असते,जेव्हा याचे सेवन मध्यम प्रमाणात केले जाते. तुम्ही पिवळ्या वाटाण्याचे प्रथिने आणि नारळाचे पाणी किती प्रमाणात प्यावे हे तुमच्या आहारातील आणि पौष्टिक गरजांवर अवलंबून असते. या पेयाचे सेवन करताना, तुमच्या दैनंदिन प्रथिनांची आवश्यकता आणि तुमची कार्यक्षमता यांसारख्या घटकांचा विचार करा, असे डॉक्टर बत्रा म्हणाल्या आहेत. तसेच व्यायामानंतर आहारात हे पेय तुम्हाला समाविष्ट करायचे आहे की नाही हे तपासण्यासाठी आहारातील पोषक विश्लेषण करणे आवश्यक आहे किंवा आहारात समाविष्ट करण्यापूर्वी तज्ज्ञांशी बोलणे गरजेचं आहे, असे डॉक्टर लवनीत बत्रा म्हणाल्या आहेत.

(टीप: वरील लेख हा प्राप्त माहितीवर आधारित आहे. गरज भासल्यास तज्ज्ञांचा सल्ला घ्या)

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात सृष्टी ग्रीन क्लबचे उद्घाटन संपन्न.

लातूर :– श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर (आय.क्यूए.सी./भूगोल विभाग), स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, युनिसेफ, मुंबई आणि महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, नांदेड विभाग, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा बसवेश्वर महाविद्यालय सृष्टी ग्रीन क्लबचे उद्घाटन व जनजागृती विस्तार व्याख्यान नुकताच संपन्न झाले.

या कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई हे होते तर विचार मंचावर प्रमुख वक्ते म्हणून कलापंढरी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बी. पी. सूर्यवंशी, लातूर कृषी विभागातील अभिजीत पांचाळ, भूगोलशास्त्र विभागाचे प्रमुख कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले, डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. गुणवंत बिरादार आणि ग्रीन क्लब अध्यक्ष वसंत साळुंखे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी पृथ्वीगोलला पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी बी. पी. सूर्यवंशी म्हणाले की, आज आपल्याला पर्यावरणाचे रक्षण करणे अत्यावश्यक आहे. सामाजिक उत्तरदायित्वाच्या माध्यमातून आपण प्रत्येकाने सृष्टी संवर्धन करणे अत्यंत गरजेचे असल्याचे सांगून यामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा सहभाग हा महत्त्वाचा आहे. आपल्या




ज्ञानाचा वापर हा समाज विकासासाठी केला पाहिजे असेही ते म्हणाले.

यावेळी अभिजीत पांचाळ म्हणाले की, निसर्गाचे संवर्धन करण्यासाठी निसर्गाची भाषा आपण अवगत केली पाहिजे. जल संवर्धनासाठी माथा ते पायथा या तांत्रिक बाबीवर विद्यार्थ्यांचे लक्ष वेधून कृषी विभागाच्या विविध मृदा व जलसंधारण कार्याविषयी माहिती व त्याचे महत्त्व विशद केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्रमुख कॅप्टन डॉ. बाळासाहेब गोडबोले यांनी ग्रीन क्लब संकल्पना व त्याची रचना याबद्दल माहिती दिली.

यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले की, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी जल, जमीन, जंगल, जनावरे आणि जन या पाच संकल्पनांचा अभ्यास करून त्याची प्रत्यक्ष कृती समाजामध्ये केली पाहिजे. विद्यार्थ्यांनी क्षेत्रकार्याच्या माध्यमातून गाव, वाडी, वस्ती आणि नगरात जाऊन वृक्ष संवर्धनाचे महत्त्व सर्वसामान्य लोकांना पथनाट्याच्या माध्यमातून समजून सांगितले पाहिजे असे ते म्हणाले.

यावेळी साळुंखे वसंत (अध्यक्ष), कु. रासुरे यशोदा (उपाध्यक्ष), कु. धोटे दिव्या व कु. भिसे ऋतुजा (समन्वयक) यांचे स्वागत करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. सिद्धी घोडके व कु. ऋतुजा भिसे यांनी केले तर आभार डॉ. अभय धाराशीवे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भूगोलशास्त्र विभागातील डॉ. शिवकुमार इजारे, डॉ. शिवप्रसाद धरणे, डॉ. संगमेश्वर धाराशिवे, डॉ. तेजश्री महाजन, रंगनाथ लांडगे, भीमाशंकर सुगरे आणि अशोक शिंदे यांनी परिश्रम घेतले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान, बीएसडब्ल्यू आणि बीसीए वर्गातील विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतीय संविधान व लोकशाही रक्षणासाठी दलित पँथर पुन्हा मैदानात– नव्या दलित पँथरचे संस्थापक अध्यक्ष अंबादास शिंदे

लातूर – संविधान के सन्मान मे, दलित पँथर मैदान मे यासाठी दलित पँथर महाराष्ट्र राज्याची स्थापना सोलापूर येथे ३ ऑगस्ट २०२३ रोजी पुर्नजिवीत करण्यात आली आहे. दलित पँथरचे पुर्नजीवन अंबादास शिंदे संस्थापक अध्यक्ष यांनी महाराष्ट्रातील सर्व मान्यवर जुने नवे दलित पँथर कार्यकर्ते व इतर कार्यकर्ते त्यांचे उपस्थितीमध्ये पुर्नजीवन करुन छत्रपती शिवाजी महाराजांचे १३ वे वंशज शिवश्री फत्तेसिंह राजे भोसले यांची सर्वानुमते दलित पँथर महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आलेली आहे. गेल्या १ महिन्यापासून महाराष्ट्रातील १२ जिल्हयामध्ये दलित पँथरचा झंझावात सुरू आहे. मुंबईसह महाराष्ट्रामध्ये लोकांमध्ये नवचैतन्य पसरलेले आहे. अशी माहिती आज १५ सप्टेंबर रोजी लातूर येथील पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत या नव्या दलित पँथरचे संस्थापक अध्यक्ष अंबादास शिंदे यांनी दिली आहे. यावेळी दलित पँथरचे राज्य उपाध्यक्ष डी. एस. नरसिंगे, लातूर जिल्हाध्यक्ष सुनील मांदळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. जातीयवादी आर एस एस ने जाणिवुपर्वक निर्माण करुन जातजमातीमध्ये वेगवेगळ्या कारणाने वाद निर्माण करून जातीय दंगे घडविण्याचा प्रयत्न चालु आहे. केंद्रसरकार व महाराष्ट्र राज्य सरकार हे मनुवादी जातीवादी सरकार आहे. त्याने भारतीय घटनेची मोडतोड़ करुन राज्य कारभार करत आहेत. भारतीय घटना रदद करुन नवीन घटना तयार करण्याचे गुप्त कारस्थान चालु आहे. भारतीय घटनेने भारत देशामध्ये सर्व जाती जमातीमध्ये समता, मानवता व बंधुता निर्माण करण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सुमारे ३ वर्ष मोठ्या कष्टाने घटना तयार करुन जगातील एक उत्कृष्ट व आदर्श घटना देशाला अर्पण केली आहे. यामुळे देशातील ३% मनुवादी आर एस एस वाले यांना ही घटना नको आहे. त्यांची वर्चस्व असलेली व जातीय व्यवस्था असलेली घटना पाहिजे आहे. म्हणून ते मुददाम अराजक निर्माण करुन देश ताब्यात घेत आहेत. देशामध्ये शिक्षण, आरोग्य, बेरोजगारी याकडे त्यांचे आजिबात लक्ष नाही. ही व्यवस्था उध्दस्त करण्यात आलेली आहे. मोठया कष्टाने उभे केलेले सरकारी उद्योगधंदे नष्ट करुन देशातील भांडवलदाराला देण्यात आलेले आहेत. त्यामुळे देशातील अनुसूचित जाती जमाती, भटक्या जमाती, ओबीसी या सर्व घटकांचे आरक्षण यामुळे रदद होणार आहे. हा त्यांचा छुपा डाव आहे. देशामध्ये जातीय अन्याय, अत्याचार प्रचंड वाढलेले आहेत. महिला सुध्दा सुरक्षित नाहीत. याची गंभीर दखल दलित पँथरने घेऊन प्रबोधन व आंदोलन करीत आहेत. राज्यातील मराठा आरक्षण हे घटनेमधील




५०% ची मर्यादा वाढवुन देता येते. पण केंद्र सरकार व राज्य सरकार हे मुददाम करत नाहीत. त्यामुळे महाराष्ट्रात उपोषणे आंदोलने चालु आहेत. त्यामुळे जाती जमातीत अविश्वास व दंगल सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. एकुणच देशामध्ये लोकांचे जीवन व वित्त सुरक्षित नाही. यासाठी दलित पँथर लढणार आहे. अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. देशामध्ये जातीय जनन गणना करुन जातीय आकडेवारी नुसार आरक्षण देण्यात यावे. अशी दलित पँथरची मागणी व भुमिका आहे. देशामध्ये ३% ब्राम्हणांची लोकसंख्या आहे. पण त्यांनी सर्वत्र जवळ जवळ ७०% आरक्षण घेतलेले आहे. हे हजारो वर्षापासुन चालु आहे. या विरुध्द दलित पँथर लढणार आहे. व सर्व घटकांना न्याय मिळवून देणार आहे. असेही अंबादास शिंदे यांनी यावेळी सांगितले.

## समाजाच्या मठाची जमीन समाजाच्या समशानभूमीसाठी द्यावी- त्र्यंबक स्वामी

लातूर: लातूर शहरात सकल विरशैव लिंगायत समाजाच्या स्मशानभूमीचा प्रश्न गहन आहे मूळ बेलपत्री येथील स्मशानभूमी मध्ये जागे अभावी या समशानभूमीत मूळ प्रस्थापिता शिवाय इतरांना परवानगी नाही.

सिद्धेश्वर मंदिर जवळील समशानभूमी पहिला टप्पा जागा पूर्ण दफनविधी झाल्याने जागे अभावी त्यावर दुसऱ्या काळ्या मातीचा थर देऊन परत दुसऱ्या टप्प्यावर अंत्यविधी करणे सुरू आहे .कन्हेरी येथील मनपाने खरेदी केलेल्या स्मशानभूमीचा वाद न्यायालयात चालू असल्याने ती वापरात नाही . आजपर्यंत कोणत्याच लोकप्रतिनिधींनी सकल वीरशैव लिंगायत




समाजाच्या स्मशानभूमीचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवला नाही. तो प्रश्न सतत तेवत ठेवला आहे.एकंदरीत लातूर शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेता सकल वीरशैव लिंगायत समाजाच्या अंत्यविधीसाठी अवहेलना होत आहे ही अवहेलना व गैरसोय कायमस्वरूपी थांबवण्यासाठी पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट आलूर, जिल्हा उस्मानाबाद या मठाची महात्मा बसवेश्वर चौक लातूर जवळील कातपूर रोड लगतची समाजाच्याच मठाची १८ एकर ३३ गुंठे जमिनीपैकी ५ एकर जमीन सकल वीरशैव लिंगायत समाजाच्याच स्मशानभूमीसाठी देण्यात यावी अशी मागणी लातूर येथील सामाजिक शिवा लिंगायत युवा संघटनेने पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्टचे अध्यक्ष,सचिव,लातूरचे जिल्हाधिकारी,तसेच लातूर शहर मनपा आयुक्त यांचे कडे केली आहे .

निवेदनावर शिवा लिंगायत युवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दयानंद पाटील वीरशैव लिंगायत स्मशानभूमी बाबतच्या सतत चळवळीतील संघर्षमय सामाजिक कार्यकर्ते त्र्यंबक स्वामी .पत्रकार सोमनाथ स्वामी डिगोळकर व धडाडीच्या सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती मनीषाताई धुळशेट्टे तसेच युवराज बुलबुले आदींच्या सह्या आहेत.

या स्मशानभूमीच्या सामाजिक चळवळीस आनेकांनी सहमती दर्शवली आहे. या विषयावर पुढील दिशा ठरवण्यासाठी लवकरच एका बैठकीचे नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती शिवा लिंगायत युवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दयानंद पाटील यांनी प्रसिद्धीस दिली आहे

## मुंबई महापालिकेच्या शाळांमध्ये लवकरच ३५० रात्र अभ्यासिका सुरु होणार. रात्र अभ्यासिका शुभारंभ पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या शुभहस्ते

मुंबई /शहामत शेख:– मुंबईत अनेक कुटुंब छोटा घरात राहत असल्याने अशा कुटुंबातील मुलाच्या अडचणी लक्षात घेता, मुंबई महापालिकेच्या शिक्षण विभागाने आपल्या शाळेमध्ये रात्र अभ्यासिका सुरू करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाचे पाहिले पाऊल नित्यानंद मार्ग अंधेरी पूर्व पब्लिक शाळा येथे सुरू शुभारंभ करण्यात आले. लवकरच मुंबई महानगरपालिकेच्या इतर शाळेत रात्र अभ्यासिका सुरू करण्यात येणार आहे असे राज्याचे कौशल्य विकासत व नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी यावेळी जाहीर केले.महापालिकेच्या शाळांमध्ये लवकरच ३५०रात्र अभ्यासिका सुरु होणार. इतरमुंबई महापालिकेच्या शाळांमध्ये रात्र



अभ्यासिका सुरू कराव्यात असे निर्देश पालक मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक इकबाल सिंग चहल अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे ) श्रीमती अश्विनी भिडे सह आयुक्त गंगारथन डी. यांनी शिक्षण विभागाला अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार शिक्षण विभागाकडून रात्र पहिली अभ्यासिका नित्यानंद मार्ग पब्लिक स्कूल अंधेरी पूर्व येथे सुरू करण्यात आले.

या सोहळ्यात बोलताना पालकमंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले की, आजचा दिवस सुवर्ण अक्षरात लिहावा असा आहे अतिशय कमी वेळेत रात्र अभ्यासिका उभारणाऱ्या यंत्रणेचे अभिनंदन केले. मुंबईतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहासाठी रात्र अभ्यासिकेचे नक्कीच फायदेशीर ठरेल असा विश्वास यावेळी व्यक्त केला. त्यामुळे मुंबई महापालिकेच्या प्रत्येक शाळेत रात्र अभ्यासिका सुरू करण्यात येतील असे ते म्हणाले. यावेळी विलेपार्ले मतदारसंघाचे आमदार पराग अळवणी माजी नगरसेवक अभिजीत सावंत के पूर्व विभागाच्या सहाय्यक आयुक्त मनीष वळुंज महापालिकेचे शिक्षण अधिकारी राजेश कंकाळ शिक्षणाधिकारी माध्यमिक राजु तडवी आदीसह मान्यवर उपस्थित होते

## राष्ट्र उभारणीत अभियंत्यांचे महत्वपूर्ण योगदान.!- डॉ.सिध्दार्थकूमार सूर्यवंशी यांचे प्रतिपादन

अहमदपूर :–कूठल्याही शासनव्यवस्थेचे अंतीम ध्यैय्य लोककल्याण हेच असते. जनहिताच्या विविध योजना राबवीत असताना लोकप्रतिनिधी बरोबर अधीकारी कर्मचारी यांचीही भूमीका महत्वाची असते त्या अनूषंगाने आढावा घेतल्यास देशाच्या जडणघडणीत तथा विकास कामात तथा एकूणच राष्ट्रउभारणीत अभियंत्यांचे योगदान महत्त्वाचे आहे असे प्रतिपादन नगरसेवक डॉ.सिध्दार्थकूमार सूर्यवंशी यांनी केले.

सम्राट मित्रमंडळाच्या वतीने भारतरत्न सर मोक्षगूंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त अभीवादन तथा अभीयंता दिनाच्या निमित्ताने स्थानीक अभीयंत्यांचा सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी इंजी.अजय कस्तूरे होते तर सत्कार मूर्ती म्हणून इंजी.कमलाकर नळेगांवकर,इंजी. गणेश पूरी, इंजी.स्वरूप चिरके, इंजी.शाकीर कुरेशी,इंजी. वसीम सय्यद,इंजी.साईम शेख,इंजी. शुभम दहिफळे, इंजी.सोहेल पठाण, इंजी.नदीम शेख,इंजी. माधव शेरे,इंजी.रवी येचवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती.




सर्व प्रथम मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न सर मोक्षगूंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतीमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले.नंतर उपस्थित सर्व अभियंत्यांना शाल पूष्पगूच्छ देवून त्यांचा सम्राट मित्रमंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

पूढे बोलताना डॉ.सिध्दार्थकूमार सूर्यवंशी म्हणाले की, आपले कर्तव्य करत असताना अभियंत्यांकडून नवनिर्मिती होत असते. त्यातूनच देशाच्या विकासाचा पाया रचला जातो.म्हणून देशाच्या विकासात अभियंता वर्गाचे योगदान अविस्मरणीय आहे. परंतू कांही बोटावर मोजन्या इतक्या अप्रिय गोष्टी मूळे सबंध अभीयंता वर्गावर टीका टीप्पन्नी केली जाते. आज अभीयंता वर्गाचे योगदान दूर्लक्षीत होत असून अभीयंता वर्गाला सूध्दा मान सन्मान मिळाला पाहीजे अशी अपेक्षा व्यक्त केली.

या वेळी उपस्थित सर्वच अभीयंत्यांनी आपले मनोगत व्यक्त करून सम्राट मित्रमंडळाच्या वतीने अभीयंत्यांचा सत्कार केल्या बद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

अध्यक्षीय समारोप इंजिनियर अजय कस्तूरे यांनी केला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक तबरेज सय्यद यांनी केले तर बहारदार सूत्रसंचालन आकाश सांगवीकर यांनी केले तर आभार गणेशराव मूंडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पत्रकार अजय भालेराव,भिमराव कांबळे,मोहम्मद पठाण, नौशाद सय्यद, सचिन बानाटे आदींनी पुढाकार घेतला.

## बंजारा समाजाचे झालेले सामाजिक नुकसान भरुन काढण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घ्यावा - फुलसिंग जाधव

संभाजीनगर / रमेश राठोड :– भाषावार प्रांत रचनेपूर्वी मराठवाडा व विदर्भातील कांही भागात राहणारा व त्याकाळी बंजारी व लमाणी म्हणून ओळखल्या जाणारा आणि मुळात ट्राइब कैटेगरीत मोडणारा आजचा बंजारा समाज भाषावार प्रांत रचनेमुळे तीन प्रांतात तीन प्रवर्गात विभागल्या गेला. महाराष्ट्रातील मराठवाडा व विदर्भवासी बंजारा समाज विमुक्त प्रवर्गात समावेश झाल्याने केंद्रीय पातळीवरील सर्व सवलतीपासून तो वंचित राहिला आहे. भाषावार प्रांत रचनेमुळे या समाजाचे फार मोठे सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक नुकसान झालेले आहे. जुन्या दस्तावेजाच्या आधारावर तेलंगाणा व आंध्रप्रदेशातील या समाजाला ड्ढ प्रवर्गाच्या सवलती मिळतात. भाषावार प्रांत रचनेमुळे महाराष्ट्रात समाविष्ट झालेल्या मराठवाडा व विदर्भाच्या कांही भूभागात राहणाऱ्या बंजारा समाजाबरोबरच संपूर्ण महाराष्ट्रातील बंजारा समाजावर झालेला सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने पुढाकार घेऊन या समाजाला निजामकालीन दस्तावेजाच्या आधारावर सामाजिक न्याय मिळवून देण्याची भूमिका पार पाडावी. एका जातीला झुकते माप आणि जो खऱ्या अर्थाने उपेक्षित, दुर्लक्षित आहे त्याच्याकडे दुर्लक्ष करणे हे मानवीय दृष्टिकोणातून योग्य नाही. वास्तविक पहाता राष्ट्रीय स्तरावर या समाजाची सरकार दरबारी ट्राइब म्हणून नोंद असतांना त्याला मुळ संवैधानिक सवलतीपासून जाणीवपूर्वक दूर ठेवले गेलेले दिसते. असे नसते तर हा समाज आज सर्व प्रांतात एस टी प्रवर्गात राहिला असता. यापूर्वी महाराष्ट्र सरकारने वेळोवेळी केंद्र सरकारकडे शिफारश केलेली आहे. आशा आहे महाराष्ट्र सरकार पुन्हा एकदा ठोस पुराव्याच्या आधारे केंद्राकडे प्रस्ताव पाठवून या समाजाला सामाजिक न्याय मिळवून देईल.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE